# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 10/07/2023 (सोमवार) सकाळ

---

### जिवानीशी ठार करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

**पो.स्टे. पारशिवनी** :— फिर्यादी नामे— नरेंद्र जर्नादन पांडे, वय ४५ वर्ष रा. बखारी ता. पारशिवनी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे अप. क्र. ०४/१७ कलम ३०२, २०१ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

यातील फिर्यादी उपसरपंच यांनी फोनव्दारे माहिती दिली की, गावाजवळील जंगलात एक अनोळखी स्त्री वय २५ ते २६ वर्ष चे प्रेत पडलेले आहे. अज्ञात आरोपीने एका अनोळखी स्त्रीला हत्याराने जखमी करून जिवानीशी ठार केले. पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने जंगलात प्रेत फेकुन दिले. सदर गुन्हयाच्या तपासा दरम्यान निष्पन्न झाले की, नमुद आरोपी नामे— अमरराज जगलंजी मेश्राम वय २७ वर्ष रा. वलनी ह. मु. गिट्टीखदान नागपूर व मृतक नामे— सोनाली अमरराज मेश्राम, वय २६ वर्ष, रा. वलनी हे पती पत्नी असुन आरोपीने मृतकच्या चारीत्र्यावर संशय घेवुन हत्याराने जिवानीशी ठार केले.

सदर प्रकरणाचे तपास सहायक पोलीस निरीक्षक अनिल राऊत यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. दिंनाक १०/०७/२०२३ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश डी. जे ५—घुमरे सा़ो. न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३०२ भादवि. मध्ये आजीवन कारावास व ५०००/— रू. दंड, दंड न भरल्यास १ वर्ष साधी कैद कलम २०१ भादवि. मध्ये ३ वर्ष सश्रम कारावास व २०००/— रू. दंड, दंड न भरल्यास ३ महिने साधी कैद अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने ए.पी.पी जिकार सा़ो. यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी कर्मचारी म्हणुन सफौ. ६९० निंबाळकर पो.स्टे. पारशिवनी यांनी मदत केली आहे.

### चोरी

**पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत २४ कि.मी. अंतरावरील मौजा उतारा शिवार येथे दिनांक ०७/०७/२०२३ चे ०० ते दिनांक ०८/०७/२०२३ चे १३/०० वा. दरम्यान फिर्यादी हे पाटबंधारे विभाग काटोल येथे शाखा प्रबंधक या पदावर कार्यरत असुन उतारा शिवार येथील कोल्हापुरी बांधाऱ्याचे देखरेखीचे काम जय चंडीका पाणी वापर संस्था तारा उताराचे अध्यक्ष श्री. निलकंठराव खोडे रा. तारा उतारा हे करतात. त्यांचे शेतात काढून ठेवलेल्या २९४ लोखंडी पाटया पैकी ३४ लोखंडी पाटया प्रत्येकी ५००/— रू प्रमाणे एकुण १७०००/— चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— अश्वीन पेदाम, शाखा अभियंता यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. जलालखेडा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सपोनी चौधरी ठाणेदार पोस्टे जलालखेडा हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**